जा.क्र.नमुंमपा/परवाना/रा.फे.धो./श.फे.स.बै./८२९/२०१४
दिनांक :०६/०३/२०१४

**मा. अध्यक्ष, शहर फेरीवाला समिती तथा आयुक्त, नमुंमपा यांचे अध्यक्षतेखाली नवी मुंबई महानगरपालिका शहर फेरीवाला समितीच्या दिनांक २१/०२/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केलेल्या प्रथम बैठकीचे इतिवृत्त -**

---

प्र.मुख्य बाजार व परवाना अधिकारी श्री.प्रल्हाद ज्ञा.खोसे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले.

**बैठकीस खालील प्रवर्ग ०१ ते ०४ मधील सदस्य उपस्थित होते.**

१) श्री.ना.ना.आल्हाट,उप आयुक्त (परवाना),नमुंमपा तथा निमंत्रक, शहर फेरीवाला समिती

**प्रवर्ग -१**

१) श्री.निकम, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नमुंमपा
२) श्री.युनूस शेख, पोलिस निरीक्षक (वाहतुक), नवी मुंबई
३) श्री.गजानन पुरी, शाखा अभियंता, सहा.संचालक नगररचना विभाग, नमुंमपा

**प्रवर्ग - २**

१) मा. श्री.रघुनाथ ठाकूर तांडेल
२) मा. श्री.सदानंद रघुनाथ नार्वेकर
३) मा.श्री.प्रफुल्ल म्हात्रे
४) मा.श्रीम.सुनिता संभाजी साबळे
५) मा.श्री.नामदेव सावळेराम आहिरे
६) मा. श्री.अनिल गेणु चिकणे
७) मा. श्री. बळीराम गोविंदा आंभोरे
८) मा.श्रीम.कल्पना दत्तात्रय सुकाळे

**प्रवर्ग - ३**

१) मा.श्री. विनोद विनायक म्हात्रे
२) मा.श्री.भाऊसाहेब कोंडीबा तोरमल
३) मा.श्री. देव प्रेमनाथ शर्मा
४) मा. श्रीम.साधना ज्ञानेश वाणी

**प्रवर्ग - ४**

१) मा. श्री.धोंडीराम सोपानराव भद्रे
२) मा.श्री.प्रमोद रघुनाथ जोशी
३) मा.श्रीम.सुलोचना वासुदेव पाटील
४) मा.ॲड.श्री.मनिष ह.मिस्त्री

२/-

**विशेष निमंत्रीत सदस्य**

१) श्री.मोहन ब.डगांवकर, शहर अभियंता, नमुंमपा
२) श्री.अजिझ शेख, उप आयुक्त (अतिक्रमण), नमुंमपा
३) श्री.जी.व्ही.राव, सह शहर अभियंता (विदयुत/संगणक), नमुंमपा
४) श्री.सुभाष इंगळे, उप आयुक्त (परिमंडळ-१), नमुंमपा
५) श्री.सुरेश पाटील, उप आयुक्त (परिमंडळ-२), नमुंमपा
६) श्री.दादासाहेब चाबुकस्वार, उप आयुक्त (मालमत्ता), नमुंमपा
७) श्री.प्रल्हाद ज्ञा.खोसे, प्र.मुख्य बाजार व परवाना अधिकारी, नमुंमपा
८) श्री.अभय जाधव, कनिष्ठ विधी अधिकारी, नमुंमपा

उप आयुक्त (परवाना) यांनी पार्श्वभुमी विषद करतांना असे सांगितले की, राष्ट्रीय फेरीवाला धोरण-२००९ नुसार देशातील महापालिका/नगरपालिका क्षेत्रात कार्यवाही करणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश आणि राज्य शासनाकडील शासन निर्णयानुसार शहर फेरीवाला समिती गठित केलेली आहे. या समितीमध्ये प्रवर्ग-१-स्थानिक प्राधिकरण, नियोजन प्राधिकरण, पोलिस व इतर अशा प्रवर्गाचे प्रतिनिधी, प्रवर्ग-२- फेरीवाला संघटनांचे प्रतिनिधी, प्रवर्ग-३-रेसिडेन्ट वेलफेअर असोसिएशन्स, समुदाय आधारीत संघटना (कम्युनिटी बेस ऑरगनायजेशन्स), प्रवर्ग-४- इतर नागरी (सिव्हील) संस्था संघटना, जशा NGO, व्यावसायिक समुहातील प्रतिनिधी (जसे वकील,डॉक्टर, नगररचनाकार, आरर्कीटेक्ट इत्यादी) व्यापार व वाणिज्य समुहाचे प्रतिनिधी, शेडयुल बँकाचे प्रतिनिधी व महत्वाचे नागरीक (eminent citizens) यांचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

राष्ट्रीय फेरीवाला धोरण-२००९ मधील तरतुदी राज्य शासनाचा आदेश याबाबत सविस्तर माहिती उपस्थितांना देण्यात आली.

शहरामध्ये नागरिकांची सोय होण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण करणे, नोंदणी करणे व शहरामध्ये फेरीवाला क्षेत्र, बंधयुक्त क्षेत्र आणि ना फेरीवाला क्षेत्र अशा निरनिराळ्या तीन प्रकारच्या भागात वर्गीकरण करणे हे काम हाती घ्यावयाचे आहे. यासाठी समितीच्या सूचना उपयुक्त होणार आहेत. फेरीवाल्यांचे नियोजन व संनियंत्रण समितीच्या वतीने केले जाणार आहे.

यानंतर मा.अध्यक्ष तथा आयुक्त, नमुंमपा यांनी प्रतिपादन केले की, सदस्यांच्या काही सूचना असल्यास त्या मांडाव्यात. रास्त सूचनांचा विचार करता येऊ शकेल.

उपस्थित फेरीवाला समितीच्या सदस्यांनी केलेल्या सूचना खालील प्रमाणे-

१. **श्री.विनोद विनायक म्हात्रे, सदस्य -** प्रकल्पग्रस्तांना योग्य प्रतिनिधीत्व परवाने देताना मिळावे.
२. **श्री.नामदेव सावळेराम अहिरे, सदस्य -** सन २००० पासून लोक फेरीने व्यवसाय करीत होते. परंतु सिडको, महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने त्यांचा व्यवसाय बंद पाडला आहे. अशा फेरीवाल्यांना कायम स्वरुपी रोजी रोटीचे साधन उपलब्ध होईल अशी व्यवस्था करण्यात यावी.
३. **श्री. बळीराम गोविंदा अंभोरे, सदस्य -** सन २००४ पासून परवाना घेऊन महापालिकेला २०४०/- इतके शुल्क भरतात त्यांना प्राधान्य देण्यात यावे. महापालिकेमार्फत त्यांना कुठलीही सुविधा दिली जात नाही.

४. **श्री.प्रफुल ना.म्हात्रे,सदस्य -** फेरीवाल्यांचे योग्य प्रकारे नियोजन केल्यास नागरीकांना पदपथ मोकळे होतील. फेरीवाल्यांना रोजीरोटी उपलब्ध झाल्याने त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळेल व राहणीमानाचा दर्जा सुधारेल त्यामुळे त्यांची मुले रस्त्यावर व्यवसायासाठी येणार नाहीत. परिणामी फेरीवाल्यांची संख्या कमी होईल. महापालिका अस्तित्वात येण्यापूर्वी सिडकोच्या काळातील फेरीवाल्यांवर महापालिकेमार्फत कारवाई होते, मालाची नासधूस होते त्या फेरीवाल्यांच्या संरक्षणासाठी मी लढत आहे. ज्यांना महापालिकेने परवाने दिलेले आहेत अशांना योग्य प्रकारे न्याय मिळायला हवा. केंद्राने, सुप्रिम कोर्टाने ज्या सूचना दिल्या आहेत त्यानुसार कोणत्याही नागरीकांना, वाहतुकीला त्रास होणार नाही याप्रमाणे फेरीवाल्यांना बसविण्याचे नियोजन करावे.

५. **श्री. सदानंद रघुनाथ नार्वेकर, सदस्य-** शासकीय जागा, रेल्वे स्टेशन, शाळेच्या आवारात ना फेरीवाला क्षेत्र फलक लावावेत.

६. **श्री.अनिल गेणू चिकणे, सदस्य**-ओपन गटारांवरील स्पेस, गार्डनजवळील जागा फेरीवाल्यांना बसण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी.

७. **सौ.सुलोचना वासुदेव पाटील,सदस्या-** परित्यक्ता, विधवा करीत असलेल्या व्यवसायाचा माल जप्त होतो. त्या एक तर आर्थिक विवंचनेत असतात व त्यांना कोणाचा आधार नसल्याने महापालिकेने त्यांचा योग्य तो विचार करावा.

८. **श्री. भाऊसाहेब कोंडीबा तोरमल, सदस्य-** कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी. फेरीवाले सेक्टरवाईज बसतील या दृष्टीने सर्वे करण्यात यावा. अपंग, विधवा महिलांना प्राधान्य द्यावे. नवी मुंबईमधील करदात्यांना प्राधान्य द्यावे.

९. **श्री.देव प्रेमनाथ शर्मा, सदस्य -** फेरीवाले हे शहराचा मुख्य घटक आहेत. दुकानासमोर जे फेरीवाले अतिक्रमण करतात त्यामुळे मोठया प्रमाणावर टॅक्स भरणा-या व्यापा-यांचे नुकसान होते. या करीता फेरीवाला व व्यापारी यांना सोईस्कर असे धोरण बनविण्यात यावे.

१०. **श्री. विनोद विनायक म्हात्रे, सदस्य-**अनुसुचीत जाती जमाती व प्रकल्पग्रस्तांची नोंद घेण्यात यावी.

११. **श्री. प्रमोद रघुनाथ जोशी, सदस्य-** ग्रामपंचायतकालीन व्यवसाय करणारे फेरीवाले आहेत त्यांचे पुनर्वसन होणे गरजेचे आहे. नवी मुंबईमध्ये वास्तव्य करणा-या फेरीवाल्यांचा नवी मुंबईच्या जडणघडणीमध्ये संबंध आहे. त्यांचा विचार करावा. जे करदाते नाहीत त्यांचा समावेश फेरीवाल्यांमध्ये असू नये. मतदार यादीमध्ये ज्यांचे नाव आहे अशांचा विचार करण्यात यावा.

१२. **श्री. युनूस शेख, पोलिस निरीक्षक, वाहतुक पोलीस विभाग -** वाशी येथील एपीएमसी मध्ये सणासुदीसाठी मोठया प्रमाणावर लोक वाहने घेऊन येतात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. त्या करीता जवळपास पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी.

१३. **श्री.रघुनाथ ठाकूर तांडेल, सदस्य-** से.४२, नेरुळ मध्ये स्मशानभुमी व स्टेशनपलीकडे परप्रांतीय फेरीवाले संध्याकाळी ७.३० नंतर भाजी विक्रीचा व्यवसाय करतात त्याचा नागरिकांना त्रास होतो.

त्यांच्यावर कारवाई करणेबाबत मा.आयुक्त यांनी अतिक्रमण विभागास सूचित केले.

१४. **श्री. प्रमोद रघुनाथ जोशी, सदस्य-** बेलापूर येथे दर शनिवारी आठवडी बाजार भरतो. एक जण हप्ता वसूली करतो. याबाबत अनेकदा तक्रार करुन एकदाही कारवाई करण्यात आलेली नाही. तसेच ०८ दिवसांचे प्रदर्शन भरवले जातात त्यांनाही टॅक्स लावायला हवा. व्यापारी L.B.T. भरतात त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत असल्याची त्यांची तक्रार आहे.

१५. **ॲड.श्री.मनिष ह. मिस्त्री, सदस्य -** एखाद्या क्षेत्रात फेरीवाला परवान्याचे वाटप करतांना रहिवाश्यांच्या गरजेनुसार उदा.फळे, भाजीपाला, अन्नधान्य इ. चा विचार करण्यात यावा. संबंधीत फेरीवाल्यांनी रोज संध्याकाळी व्यवसाय करीत असलेल्या ठिकाणचा कचरा साफ करायला हवा. तसेच मच्छी विक्रेते वाशी विभागामध्ये अर्धा रस्ता ब्लॉक करतात त्यामुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो.

१६. **श्री. प्रमोद रघुनाथ जोशी, सदस्य-** कोल्ड स्टोरजचे नियोजन करणे आवश्यक आहे. ठिकठिकाणी अस्वच्छ बर्फात मासळी ठेवली जाते व सर्वत्र दुर्गंधी पसरते यामुळे अनारोग्याचे शक्यता नाकारता येत नाही.

१७. **श्री. विनोद विनायक म्हात्रे, सदस्य-** करावे गावात मच्छी विक्रेत्यांमुळे दुर्गंधी पसरते. या करीता स्वतंत्र व्यवस्था होणे आवश्यक आहे. प्रत्येक घरातील एका व्यक्तीला परवाना मिळायला हवा. ग्रामपंचायतकालीन मच्छीविक्रेत्यांना परवाने देण्यात आलेले नाहीत. ७० लोकांची यादी आहे ओटले मोठे आहेत. एका ओटल्यावर दोन जण बसू शकतात.

१८. **श्री.प्रफुल ना.म्हात्रे, सदस्य -** वाशीमध्ये मसजिदपासून तुर्भे स्मशानभुमीपर्यंत मोठे गटार आहे. वाशीमध्ये गटारावर पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे. परंतु त्या ठिकाणी वाहने पार्किंग करुन नागरिक से.९ मध्ये चालत जाणार नाहीत. या करीता गटारावर वाशीतील सर्व फेरीवाले बसविले तर फेरीवाल्यांचा प्रश्न सुटू शकतो. भाजीपाला, फळ विक्रेते, कटलरी इ. व्यवसाय वेगवेगळया ठिकाणी उपलब्ध करणे शक्य आहे. तसेच २०४०/- रुपये इतके शुल्क ज्यांच्याकडून घेतले जाते त्यांतील काही लोकांना कोपरखैरणे येथे भुखंड दिलेला आहे. तसेच वाशी मध्ये से.९, १५ येथे फेरीवाले बसविले आहेत. काही विना परवाना आहेत त्यांच्यावर कारवाई केली जात नाही.

१९. **श्री. प्रमोद रघुनाथ जोशी, सदस्य -** जागेची नोंदणी होणे आवश्यक आहे. जेणेकरुन १ परवाना ४ ठिकाणी वापरु शकणार नाही. आय.डी., थंब इंप्रेशन वगैरे टेक्नॉलॉजी वापरात आणल्यास कोणी परवान्याचा गैरवापर करण्यास धजावणार नाही.

२०. **श्री.प्रफुल ना. म्हात्रे, सदस्य -** सध्या विना परवाना फेरीवाल्यांवर कारवाई चालू आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात येऊ नये.

५/-

२१. **श्री. देव प्रेमनाथ शर्मा, सदस्य -** मार्जिनल स्पेसमध्ये दुकानाशी संबंधित साहित्य/मालाचे लोडींग-अपलोडींग केले जाते. त्यामुळे दुकानासमोर फेरीवाल्यांना जागा न देता अन्य ठिकाणी जागा वितरीत करणे आवश्यक आहे.

२२. फेरीवाला सर्वेक्षण अर्जाचा प्रारुप नमुना सदस्यांच्या अवलोकनार्थ ठेवून त्यांचेकडून अर्जाबाबत काही सूचना असल्यास त्या दयाव्यात असे सूचित करण्यात आले.

यानंतर मा.अध्यक्ष तथा आयुक्त, नमुंमपा यांनी उपस्थित सदस्यांनी केलेल्या सूचनांपैकी रास्त सूचनांचा विचार करता येईल असे सूचित करुन सदर बैठक संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत/-

**निमंत्रक**

मा.आयुक्तसो- यांचे मान्यतेने

**शहर फेरीवाला समिती**
**तथा**
**उप आयुक्त (परवाना)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

प्रत :- १) मा.महापौर, नवी मुंबई
२) मा.सभापती, स्थायी समिती, नमुंमपा
३) सर्व सन्मा. सदस्य, शहर फेरीवाला समिती -----------------------------------
४) सर्व सन्मा. निमंत्रीत सदस्य, शहर फेरीवाला समिती --------------------------
५) सर्व विभागप्रमुख---------------------------